
# UoP to end confusion over names of courses

## Meet To Discuss Issue Of Too Many Regulatory Bodies

TIMES NEWS NETWORK

**Pune:** A special meeting of the University of Pune's (UoP) academic council will be held in June to discuss the issue of multitudes of regulatory bodies for colleges and to smoothen complications arising out of varying nomenclatures for degree and diploma courses.



The matter of varying nomenclatures for courses holds immense significance for students who wish to study abroad. For, most foreign universities accept only those programmes that are recognised by the University Grants Commission (UGC).

UoP vice-chancellor (V-C) Narendra Jadhav told reporters on Friday that the nomenclatures of certain degree and diploma courses offered by the UoP and affiliated colleges, like masters in personnel management (MPM), materials mangement (MMM) and computer management (MCM), were not part of the list of academic programmes recognised by the UGC.

Moreover, the colleges offering these programmes have to toe the line of a plethora of bodies, such as the all-India council for technical education (AICTE); the state government's directorate of technical education (DTE), the UGC and the UoP, among others.

As per university norms, all proposals, such as those for setting up new colleges, changes in syllabi, new courses, student intake et al, have to be finalised before October 31 every year.

On the other hand, the AICTE clears these proposals throughout the year. The UGC, on the other hand, has its own norms. All this is creating complications, he said.

He said the the UoP had certain nomenclatures for academic programmes that have been in use since the early 1990s. "We have the option of either changing them to bring them in tune with the UGC list or to get the UGC to expand its list while we retain the nomenclatures," he added.

Jadhav said that the UoP had in fact placed the two options before the UGC five years back. A panel of the UoP academic council, headed by principal V B Gaikwad, was assigned to go into the issue and recommend measures to be placed before the UGC. However, the matter was not eventually followed up properly with the UGC authorities, Jadhav said.


Jadhav stated that the upcoming special meet, which would also have representatives from the state government and the regulatory bodies, will now take up these recommendations for discussion. "The ultimate objective is to see that there is no turf war between the different agencies regulating higher education."

Times of India 10/5/08

# आगामी दोन वर्षे परीक्षा शुल्क न वाढविण्याचा निर्णय

**पुणे, दि. ९ (प्रतिनिधी)- पुणे विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयांमध्ये परीक्षा शुल्कात वाढ न करण्याचा निर्णय विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला आहे. परीक्षा शुल्कात पाच टक्क्यांनी वाढ करण्याची सूचना परीक्षा मंडळाने केली होती; मात्र आगामी दोन वर्षांसाठी ही वाढ न करण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.**

परिषदेस विद्यापीठ आणि महाविद्यालय विकास मंडळाचे संचालक डॉ. पंडित विद्यासागर, कुलसचिव माणिकराव जाधव उपस्थित होते. पुणे विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांच्या परीक्षा शुल्कात दर दोन वर्षांनी वाढ करण्याचा निर्णय सन २००४ मध्ये घेण्यात आला होता. ही वाढ दहा टक्के इतकी होती. २००६ मध्ये या निर्णयानुसार ही वाढ करण्यात आली होती. यंदा ही वाढ पाच टक्के इतकी करण्यासंदर्भात परीक्षा मंडळाने सूचना केली होती. मात्र विद्या परिषदेच्या काल आणि आज झालेल्या बैठकीत परीक्षा शुल्कात वाढ न करण्याचा निर्णय घेण्यात आला, असे कुलगुरू यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, गेल्या काही महिन्यांपासून देशात महागाई वाढत आहे. परीक्षा शुल्कात वाढ केल्यास गरीब विद्यार्थ्यांवर अन्याय केल्यासारखे आहे, त्यामुळे पुढील दोन वर्षे ही वाढ न करण्याचा निर्णय घेण्यात आला. चालू शैक्षणिक वर्षात प्रथम वर्ष पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात बदल करण्यात येणार असल्याचेही त्यांनी या वेळी नमूद केले.



पुढील वर्षी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय वर्षांचा अभ्यासक्रमही सुधारित करण्यात येणार आहे. अभ्यासक्रम सुधारित करण्यासंदर्भात समितीची स्थापना करण्यात आली असून कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या २२ अभ्यासक्रमात बदल करण्यात येणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले.

नवीन विषय, विस्तार आणि तुकड्यांचे नूतनीकरण करण्यासंदर्भात १४६ प्रस्ताव आले होते. त्यांना विद्या परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असल्याचे सांगून डॉ. जाधव म्हणाले की, कायम संलग्नीकरणासंदर्भात विद्यापीठाकडे २३ प्रस्ताव आले आहेत. यातील बहुतांश प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. कायमस्वरूपी संलग्नीकरणाचे प्रमाण अद्यापही कमी आहे.

सुमारे पंचवीस टक्के इतके कायमस्वरूपी संलग्नीकरणाचे प्रमाण आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी विद्यापीठाकडून येत्या काळात पुढाकार घेण्यात येईल. याशिवाय दूरस्थ अभ्यासक्रम संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात सत्रपद्धतीचा चालू शैक्षणिक वर्षापासून अवलंब करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठाअंतर्गत अभ्यासक्रमांना सामाईक नाव देण्यासंदर्भात डॉ. गायकवाड यांची समिती नियुक्त करण्यात आली आहे. दीड महिन्यानंतर ही समिती यासंदर्भातील अहवाल देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रभात 10/5/08

चिंतन इमेज मेकर्स

# University of Pune to have industry-friendly face

## First undergraduate, post-graduate courses revamped

EXPRESS NEWS SERVICE
MAY 9

ALL the first year under graduate and post-graduate courses of the University of Pune will have an industry-friendly face from the coming academic year. The two-year revamp process, which started in August 2006, has finally gained a constructive format. The new curricula will be implemented from June.

The university had started redrafting all the curricula two years back to make it in tune with the industry requirements. Currently, the university runs 484 curricula of which 222 are for the first year under graduate and post-graduate level are fully revamped and ready to implement. "The Academic Council on Friday decided to implement the changed curricula from the academic year 2008-09. The remaining curricula are in process of change and will be implemented in a phased manner," said Vice-Chancellor Narendra Jadhav.

Jadhav had declared the time-line to make changes in the present curricula, which are not industry friendly, when he took over two years back. "Accordingly, the Board of Studies, the 12 faculties, the sub-committee of the Academic Council conducted more than 800 meetings to discuss what should be incorporated in the new curricula. We had opinions from the industry experts also," said Jadhav. He said from the next academic year, curricula of the second year post-graduate courses would also be changed. "In 2010-11, the remaining under graduate courses - that is second year and third year - will be changed," he added.

"The present courses are very old and in the current scenario they are not of much use. When a post-graduate or a graduate goes in the industry, his first nine months get exhausted in learning. We want to narrow this big gap. With the new courses in place, we hope the gap will be narrowed down to barely two months," said Jadhav. He also said that the changed curricula would be available on the university's website very soon. "We are also in process of commissioning experts to write textbooks of the changed curricula," he said.

### V-C says no to fee hike



The vice-chancellor has clarified that the universe would not increase the examination fee for the next two years. "The university in 2004 had decided to increase the examination fee by 10 per cent every two years. Accordingly, it increased the fee in 2006. This year also the members of the Academic Council were favouring the hike at least by five per cent. But as the examination department has surplus funds, I decided not to increase the fee for the next two years...we don't want to burden the students," he said.

Indian Express 10/5/08



जलगांव. पुणे के कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव से पुरस्कार प्राप्त करते हुए जलगांव के साहित्यकार अनिल परदेशी. अनिल परदेशी को इस वर्ष के महाराष्ट्र राज्य साहित्यकार पुरस्कार से नवाजा गया है.

नवभारत 9/5/08

# विद्यापीठ अभ्यासक्रमांच्या नियमांमध्ये एकवाक्यता आणणार - डॉ. नरेंद्र जाधव

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी) - राज्यातील सर्व विद्यापीठांमधील अभ्यासक्रमांचा विस्तार, पदव्यांची नावे, प्रवेशक्षमता आणि नव्या महाविद्यालयांना परवानगी देण्याविषयी सध्या वेगवेगळे नियम असून, या नियमांमध्ये एकवाक्यता आणली जाणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. या मुद्द्यावर पुणे विद्यापीठाने नेमलेली समिती येत्या दीड महिन्यात आपला सुधारित अहवाल सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलगुरू म्हणाले, राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांसह पदव्यांची नावे, प्रवेशक्षमता आणि नव्या महाविद्यालयांना मान्यता देण्याबाबत वेगवेगळे नियम आहेत. विद्यापीठांवर नियंत्रण असलेल्या यू.जी.सी, एआयसीटीई, डी.टी.ई या संस्थांनी हे नियम केलेले आहेत. या नियमानुसार विविध विद्यापीठांमधील अभ्यासक्रमांची यादी जुळत नाही. पदव्यांच्या नावाचाही घोळ आहे. विद्यापीठांना 'यू.जी.सी'च्या नियमांचे पालन करण्यासोबत तंत्र शिक्षणाशी संबंधित अभ्यासक्रमांसाठी एआयसीटीई आणि राज्य सरकारच्या डी.टी.ई. संस्थेचे नियमही पाळावे लागतात.

नियमांची ही समस्या दूर करून त्यात एकवाक्यता आणण्यासाठी एआयसीटीईने डॉ. विजय खोले यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीसोबतच विद्यापीठाने व्ही. बी. गायकवाड यांची समिती नेमली आहे. या समितीने व्यवस्थापन परिषदेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत आपला अहवाल सादर केला. मात्र, विद्यापीठाने त्यांना या अहवालात आणखी सुधारणा करण्यास सांगितले असून, या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी येत्या सहा आठवड्यांत व्यवस्थापन परिषदेची विशेष बैठक बोलावण्यात येणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले.

### विद्यापीठाचे परीक्षा शुल्क दोन वर्षे वाढविणार नाही!

विद्यापीठाच्या परीक्षा शुल्कामध्ये दर दोन वर्षांनी ५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव परीक्षा विभागाच्या समितीने ठेवला होता. विद्यापरिषदेने या प्रस्तावाला मान्यता दिली. मात्र, गोरगरीब व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फीवाढीचा फटका बसू नये, यासाठी यापुढील दोन वर्षे परीक्षा शुल्कात कुठलीही वाढ केली जाणार नसल्याचे कुलगुरूंनी सांगितले.

सामना 10/5/08

चिंतन इमेज मेकर्स

# UoP introduces semester system for post-graduation

## 5 lakh students from 470 colleges to benefit

**Subroto Roy**

The University of Pune (UoP) for the first time has introduced the semester system in colleges at the post-graduation level. Around five lakh students in all faculties from around 50% of the 470 odd colleges will benefit from the decision.

Vice-chancellor (VC) Narendra Jadhav announced the landmark decision on Friday. Though the semester system was existing at all UoP departments, colleges did not have it until the decision was taken during a two-day academic council meeting. It will reduce the lo[illegible]n students during a single annual exam.

When *DNA* asked the VC if the decision was aimed at impending entry of foreign universities into the country, he said, "We don't have to worry about any competition because the UoP has the best combination of fee and quality. These universities will attract those students who are rich and not so good in academics. The best will remain with us," he said.

Jadhav is also 'keen' on a dual degree system. He said talks were on with the government to allow full credit sharing and dual degree system with foreign universities. "It is bound to happen very soon," he said, adding "the global mobility of students will also go up."

### Sweeping changes



**As part** of what the VC considers as 'sweeping' changes in the academic framework of the UoP, Jadhav announced that the 60,000 odd 'external' students currently pursuing various courses will be converted into 'distance learning'.

**He said** the change is not for namesake but will imply students to benefit from e-learning coupled with classroom teaching, which is better than the external mode.

**The VC** also said that the academic council had okayed a proposal of bulk learning opportunities via distance learning for military personnel.

**The courses** will be available on the web. The details of the mode of delivery of courses and their contents are being worked out by a committee headed by Shirur-based UoP senate member N S Nikam.

# No hike in fee for 2 years: VC

**DNA Corrspondent**


Pune university vice-chancellor Narendra Jadhav, on Friday re-iterated that there would be no increase in exam fee of any of its courses for the next two years. He had first made the announcement in March during this year's budget presentation at the senate meeting.

Jadhav said that the fee hike was not done despite spiralling prices as the exam section had 'enough money to sustain'. "I do not know what would be the inflation or the policy of the UoP after two years," he added.

Although it was decided in 2002 that the fee structure would be revised after every two years in keeping with the inflation, no revision has been affected. "The tuition fee is not in our hands to fix, but we can control the exam fee," he said.

Jadhav said that if the UoP betters education at no extra cost, then it could expect improvement in enrolment from the current 9.5% to the targeted 25%. He pointed out that the decision about fee was not aimed at competing with foreign universities which might set up campuses in India.

DNA. 14/5/08



# 'विकासदर उंचावला, मात्र रोजगारनिर्मितीचा वेग मंदावला'

पुणे (प्रतिनिधी) : १९९१ नंतर राष्ट्रीय विकासाचा दर सातत्याने उंचावत गेला मात्र रोजगारनिर्मितीचा वेग मंदावत चालला आहे. आर्थिक सुधारणांचे फायदे मिळालेला वर्ग आणि त्यापासून वंचित राहिलेला वर्ग यामध्ये मोठी दरी निर्माण होत आहे. ही दरी वेळीच कमी केली नाही तर सामाजिक स्थैर्याला सुरुंग लागल्याशिवाय राहणार नाही, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

वसंत व्याख्यानमालेच्या १३४ व्या ज्ञानसत्रात 'भारतीय अर्थव्यवस्था आणि शेतीचे भवितव्य' या विषयावर ते बोलत होते. स्वातंत्र्योत्तर आर्थिक विकासाचा आढावा घेत ते म्हणाले, गेल्या काही वर्षांत उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रींच्या माध्यमातून आर्थिक क्षेत्रात मोठे बदल झाले. १९५१ ते १९९१ दरम्यान राष्ट्रीय विकासाचा दर सरासरी ३.५ टक्के होता. आता तो ९.३ टक्क्यांचा वर गेला आहे. १९७६ मध्ये ४४ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होतो. आता हे प्रमाण २७-२८ टक्क्यापर्यंत आणून दारिद्र्य नियंत्रणात काही प्रमाणात यश मिळाले आहे. आपल्या देशातील

### वसंत व्याख्यानमाला

परकीय चलनाची गंगाजळी ३०० अब्ज डॉलरहून जास्त झाली आहे. सकारात्मक बदलांबरोबर नकारात्मक बदलही विचारात घेत ते म्हणाले, रोजगारनिर्मितीचा वेग सातत्याने मंदावत आहे. जवळजवळ ३० कोटी जनता आजही दारिद्र्यरेषेखाली आहे. सरकारी आकडेवारीनुसार देशात दीड लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे लांच्छनास्पद आहे.

शेतीतील उत्पन्नाच्या तुलनेत शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण कमी झालेले नाही हे व्यस्त गुणोत्तर हीच शेतीची मूळ समस्या आहे. उद्योग व सेवा क्षेत्राचा विकासदर ९ टक्के तर शेतीचा विकासदर फक्त २.६ टक्के आहे. शेतीतील अतिरिक्त मनुष्यबळ सामावून घेण्यास उद्योग व सेवा क्षेत्र असमर्थ ठरले आहे. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. त्यासाठी दुसऱ्या हरित क्रांतीची गरज आहे. विकसित देशांनी अन्नधान्याच्या लागवडीखालील जमीन जैवइंधन व इतर कारणांसाठी वापरल्याने जागतिक पातळीवर अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली आहे. अपल्याकडील महागाई ही जगाच्या तुलनेत कमी असली तरी ती गंभीर आहे.

14/5/08

पुढारी

# गायकवाड समिती अहवालात सुधारणा करणार : डॉ. जाधव

पुणे (प्रतिनिधी) : नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, पदव्यांची नावे ठरवणे, प्रवेश क्षमता आणि नवीन महाविद्यालयांना परवानगी देणे यासाठी नियमांमध्ये एकवाक्यता आणण्यासाठी नेमलेल्या व्ही. बी. गायकवाड समितीने दिलेल्या अहवालात सुधारणा करण्यास सांगण्यात आल्याचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

राज्यातील विविध विद्यापीठांवर विद्यापीठ अनुदान आयोग, एआयसीटी आणि डीटीई या तीन संस्थांचे नियंत्रण असते. नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी, पदव्यांची नावे ठरवताना, अभ्यासक्रमासाठी प्रवेशक्षमता ठरवताना आणि न[illegible] महाविद्यालयांना परवानगी दे[illegible] या संस्थांच्या असलेल्या नियमांमुळे अनेक अडचणी येतात. तसेच यामध्ये मोठा कालापव्ययही होत आहे. त्यामुळे या तीनही संस्थांच्या नियमांत एकवाक्यता आणण्यासाठी पुणे विद्यापीठाने व्ही. बी. गायकवाड यांची समिती नेली होती. गुरुवार व शुक्रवारी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीत गायकवाड समितीने आपला अहवाल सादर केला. यावर चर्चा होऊन त्यास पुन्हा सुधारणा करण्यासाठी व नव्याने अहवाल सादर करण्यास या समितीला सांगण्यात आले आहे. पुढील पंधरा दिवसांत ही समिती आपला अहवाल सादर करणार आहे.

12/5/08

# Pune university to push for affiliation

Vishwas Kothari | TNN

**Pune:** Chief of the University of Pune's (UoP) board of college and university development, Pandit Vidyasagar, has said that "barely 25 to 30 per cent of the 474 colleges have got permanent affiliation so far".

The university has over five lakh students at the 474 colleges across Pune, Nashik and Ahmednagar districts.

Vice-chancellor Narendra Jadhav said, "It is a matter of a college's willingness to invest more and improve its infrastructure for long-term benefits. Some are reluctant while some are laggard in pursuing permanent affiliation."

The UoP has taken serious cognisance of the situation and has decided to convince the colleges to go for permanent affiliation. "We have decided to give a push to these matters over the next few months," Jadhav said.

According to Gajanan Ekbote, chairman of the Progressive Education Society (PES), which runs a slew of institutions across the city, the prime factors that desist a college from seeking permanent affiliation are: excessively stringent norms; personal ego clashes among members of the academic council, which clears such proposals; and lack of awareness among colleges as to when and how to seek permanent affiliation.

For instance, the essential norms require the colleges to have a minimum six years of standing; permanent buildings of its own with sufficient classroom accommodation; teachers' common room; separate common rooms for male and female students; office room and accommodation for principal; hostels for boys accommodating 15 per cent of total students and for girls accommodating 10 per cent of students.

On the 'desirable side', colleges are expected to provide flat-like accommodation for 25 per cent of its teaching staff; workshop facilities for science wing; non-resident students centre, including health facility with visiting doctor; guest house; cafeteria, students welfare centre, a gymnasium, auditorium and a playing field with a 400-metre running track.

On the academic front, the norms require the colleges to have a principal, who has been occupying the post for at least three years; 50 per cent of its teachers as permanent employees; and exam results comparable to the results of the universities.

During former V-C Ashok Kolaskar's tenure, the UoP academic council had approved a proposal that all those colleges rated 'B' and above by the National Assessment and Accreditation Council be granted permanent affiliation. However, the proposal had to be put on hold in the wake of opposition over issues of interpretation.


PUNE MIRROR
Wakes you up!
Complimentary with this copy of The Times of India*
*For Pune & Pimpri-Chinchwad Only


Times of India
13/5/08


# UoP to end confusion over names of courses

## Meet To Discuss Issue Of Too Many Regulatory Bodies

TIMES NEWS NETWORK

**Pune:** A special meeting of the University of Pune's (UoP) academic council will be held in June to discuss the issue of multitudes of regulatory bodies for colleges and to smoothen complications arising out of varying nomenclatures for degree and diploma courses.

The matter of varying nomenclatures for courses holds immense significance for students who wish to study abroad. For, most foreign universities accept only those programmes that are recognised by the University Grants Commission (UGC).



UoP vice-chancellor (V-C) Narendra Jadhav told reporters on Friday that the nomenclatures of certain degree and diploma courses offered by the UoP and affiliated colleges, like masters in personnel management (MPM), materials mangement (MMM) and computer management (MCM), were not part of the list of academic programmes recognised by the UGC.

Moreover, the colleges offering these programmes have to toe the line of a plethora of bodies, such as the all-India council for technical education (AICTE); the state government's directorate of technical education (DTE), the UGC and the UoP, among others.

As per university norms, all proposals, such as those for setting up new colleges, changes in syllabi, new courses, student intake et al, have to be finalised before October 31 every year.

On the other hand, the AICTE clears these proposals throughout the year. The UGC, on the other hand, has its own norms. All this is creating complications, he said.

He said the the UoP had certain nomenclatures for academic programmes that have been in use since the early 1990s. "We have the option of either changing them to bring them in tune with the UGC list or to get the UGC to expand its list while we retain the nomenclatures," he added.

Jadhav said that the UoP had in fact placed the two options before the UGC five years back. A panel of the UoP academic council, headed by principal V B Gaikwad, was assigned to go into the issue and recommend measures to be placed before the UGC. However, the matter was not eventually followed up properly with the UGC authorities, Jadhav said.

Jadhav stated that the upcoming special meet, which would also have representatives from the state government and the regulatory bodies, will now take up these recommendations for discussion. "The ultimate objective is to see that there is no turf war between the different agencies regulating higher education."

Times of India


चिंतन इमेज मेकर्स

# कर्मचाऱ्यांसाठी 'स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र' स्थापन करणार

पुणे, दि. १४ (प्रतिनिधी) : पुणे विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शैक्षणिक व प्रशासकीय दर्जा उंचावण्यासाठी 'स्वतंत्र प्रशिक्षण केंद्रा'ची स्थापना करण्यात येणार आहे, असे कुलगुरू डॉ. जाधव यांनी येथे सांगितले.

विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी स्थापना करण्यात आलेल्या 'क्वालिटी सर्कल फोरम'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी व्यवस्थापन गुरू डॉ. प्र. चिं. शेजवलकर, कुलसचिव डॉ. एम. एल. जाधव, वित्त व लेखा अधिकारी संजय गवई, परीक्षा नियंत्रक एम. एस. फिरंगे, जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. एस. के. पाटील, विद्याप्रबोधिनीचे संचालक डॉ. ज्ञान पाटील, विद्या गारगोटे, प्रमोद भडकवाडे आणि सचिन सुर्वे उपस्थित होते.

लोकमत
15/5/08



पुणे विद्यापीठात क्वालिटी सर्कल फोरमचे उद्घाटन करताना डॉ. प्र. चिं. शेजवलकर, शेजारी कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव.

17/5/08

[illegible]
4318
17/6/08

१/५/२००८ ते
३०/५/२००८

# एनडीएच्या विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान सोहळा

पुणे : राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या ११४व्या तुकडीचा पदवीप्रदान समारंभ पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी प्रबोधिनीचे कमांडंट एअर मार्शल टी. एस. रंधवा उपस्थित होते. यावेळी १६५ विद्यार्थ्यांना विविध शाखेतील पदवी प्रदान करण्यात आली. सिद्धार्थ गुप्ता याने यंदाचे 'चीफ ऑफ नेव्हल स्टाफ' पारितोषिक पटकाविले. तसेच त्याने विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक पटकावला. जावेद खान याने 'चीफ ऑफ एअर स्टाफ' पारितोषिक प्राप्त केले. मेजर जनरल बी. एस. गरेवाल यांनी आभार मानले.



**राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या ११४व्या पदवीप्रदान समारंभात पारितोषिक प्रदान करताना पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव, शेजारी एअर मार्शल टी. एस. रंधवा.**

केसरी
३/५/०८

[illegible]
18/0[illegible]

EA

चिंतन इमेज मेकर्स

# PIO quota: UoP committee to draft fresh mechanism

## Management Council Gives Nod For 5 Research Chairs

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The management council of the University of Pune (UoP) on Wednesday assigned a four-member panel to probe into the controversial issue of admissions to people of Indian origin (PIO) students.

The PIO issue figured prominently at the UoP's management council meeting that went on for a six-hour marathon session on Wednesday.

UoP vice-chancellor Narendra Jadhav told TOI that the panel would work independent of the ongoing special audit of the university's International Students Centre (ISC), which is being conducted by a Mumbai-based chartered accountant.

"The audit would take two months and would be subject to further review by the management council," Jadhav said and added that the university had to deal with a more urgent issue of ensuring smooth admissions to PIOs in the academic year beginning June.

"While the special audit has a broader connotation, the management council panel would focus on defining rules and mechanism for PIO admissions ahead," Jadhav said.

Council member Sunanda Pawar will head the panel, which also includes principal Sarjerao Nimse and senior law faculty members Sureshchandra Bhosale and Dilip Ukey.

"The panel will submit its report on fresh admission mechanism within a fortnight," Jadhav said. Later, it would take another fortnight to examine whether any impropriety was involved in the PIO admissions effected over last five years, he added.

### Key Decisions

- 3 per cent job quota to be implemented for the physically challenged against overall sanctioned posts instead of department-wise implementation.
- The move will create 8 additional posts for the physically challenged
- Six-member internal advisory panel to handle UoP's Dubai campus project
- Fresh guidelines for Quality Improvement Programme approved
- Sports scholarships for university players excelling at national events
- Multi-member panel under BCUD chief to handle all upcoming MoUs by the university

Among other things, the council gave an 'in principle' nod to five new research chairs in the name of social leaders and reformers Karmaveer Bhaurao Patil, Savitribai Phule, Vitthal Ramji Shinde, Dadasaheb Gaikwad and Lahuji Vastad. The council's nod is controversial considering that the UoP has drawn much criticism over the existing non-functional research chairs. Of the 20 such research Chairs, nine are headless and not functioning.

However, Jadhav explained that the chairs, which are non-functional, were mainly due to conditions like funding sources and the need for infusing fresh funds. "Those who had funded these chairs, have long stopped extending the requisite flow of money. It is now upto the UoP to see how it can rejuvenate these chairs through the university funds. That will take some time," he said.

He said, the newly proposed chairs were being cleared in consultation with Maharashtra chief minister Vilasrao Deshmukh, National Congress Party (NCP) leader Sharad Pawar and Peasants and Workers Party leader N. D. Patil, among others. "The university will bring funds for the same from the state government," he said.

Times of India
1/5/08

---

पुणे विद्यापीठ

# प्रवेश चौकशीसाठी समिती

## आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र : नवी नियमावली तयार करण्याचा निर्णय

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ३० : विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रामार्फत होणाऱ्या प्रवेशांबाबत नवी नियमावली तयार करण्यासाठी; तसेच झालेल्या प्रवेशांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत आज घेण्यात आला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव होते. या समितीच्या अध्यक्षपदी सुनंदा पवार यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. सर्जेराव निमसे, ॲड. सुरेशचंद्र भोसले व ॲड. दिलीप उके हे या समितीचे सदस्य आहेत. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राने गेल्या सात वर्षांत केलेल्या प्रवेशांबाबत विविध आरोप-प्रत्यारोप होत आहेत. विद्यापीठाच्या या केंद्राला अशा प्रकारे प्रवेश करण्याचे अधिकारदेखील नाहीत, असाही आरोप करण्यात येत आहे. माहिती अधिकाराच्या आधारे विद्यार्थी संघटनेचे नेते विजय शिंदे गेली तीन वर्षे या विषयाचा पाठपुरावा करीत आहेत. शिंदे व विद्यापीठ अधिसभा सदस्य प्रा. अतुल बागूल यांनी पत्रकार परिषदेत नुकतीच प्रवेशातील गैरप्रकाराबाबत माहिती दिली होती. प्रवेशातील गैरप्रकार समोर यावा, यासाठी या प्रकरणी शिंदे यांनी उच्च न्यायालयातही धाव घेतली होती. या पार्श्वभूमीवर बैठकीत आज या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### पदव्युत्तर प्रवेशासाठी विद्यापीठाची यंत्रणा

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश विद्यापीठाने केंद्रीय पद्धतीने करण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला. या प्रक्रियेत सहभागी होणे महाविद्यालयांना सक्तीचे नाही. मात्र, या प्रवेश पद्धतीत सहभागी झालेल्या महाविद्यालयांसाठी ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. एकाच अभ्यासक्रमासाठी अनेक महाविद्यालयांत प्रवेशासाठी हेलपाटे मारण्याची विद्यार्थ्यांची अडचण दूर व्हावी, ही यामागील प्रमुख भूमिका आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यापीठ फंडाच्या निधीतून यापुढे नवी अध्यासने सुरू करू नयेत, असा निर्णय घेण्यात आला. नवी पाच अध्यासने सुरू करण्याची घोषणा कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी केली आहे. मात्र, नवी अध्यासने सुरू करताना राज्य सरकार किंवा इतर संस्थांच्या देणगीतूनच अध्यासने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### आर्थिक बाजू तपासणार

आंतरराष्ट्रीय केंद्रमार्फत झालेल्या प्रवेशांची आर्थिक बाजू तपासण्याचे काम मुंबईतील एका संस्थेकडे या आधीच सोपविण्यात आले आहे. प्रवेशामध्ये झालेल्या आर्थिक बाजूचे लेखापरीक्षण ही संस्था करणार आहे. त्यावर आधारित अहवाल विद्यापीठाला सादर करण्यात येणार आहे.

सकाळ
1/5/08

# रोजगार संधी न वाढल्याने आर्थिक-सामाजिक स्थैर्याला धोका

पुणे : राष्ट्रीय विकासाचे ध्येय साध्य करताना विकासदराबरोबर रोजगार संधी वाढली नाही. तसेच शेतीचा राष्ट्रीय उत्पादनातील वाटा ज्या प्रमाणामध्ये कमी झाला, त्या प्रमाणामध्ये शेतीवरील अवलंबून असलेली अतिरिक्त लोकसंख्या इतर क्षेत्रांमध्ये सामावून घेण्यात अपयश आल्याने, देशाच्या आर्थिक, सामाजिक स्थैर्याला धोका निर्माण झाला आहे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

वसंत व्याख्यानमालेतील कै. सदाशिवराव पिंगळे ...ी व्याख्यानाचे पुष्प काल डॉ. जाधव यांनी ...ुंफले. 'भारतीय अर्थकारण आणि शेतीचे भवितव्य' हा त्यांचा विषय होता.

वसंत व्याख्यानमाला

डॉ. जाधव म्हणाले, देशाने गेल्या १६ वर्षांमध्ये बदललेल्या अर्थनीतीमुळे नेत्रदीपक प्रगती केली. राष्ट्रीय विकासाचा दर दुपटीने वाढला आहे. गरिबीचे प्रमाण लक्षणीय कमी झाले आहे. परंतु, विकास उंचावताना रोजगार निर्मिती त्या प्रमाणात झाली नाही.

१९५० मध्ये राष्ट्रीय विकासात ५० टक्के वाटा असताना शेतीवर ७७ टक्के लोकसंख्या अवलंबून होती. सध्या राष्ट्रीय विकासामध्ये १८ टक्के वाटा असतानाही ६५ टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रात काम करते. ही लोकसंख्या इतर क्षेत्रांत सामावून घेण्यात अपयश आल्याने शेती व लोकसंख्या यांतील गुणोत्तर व्यस्त झाले. यामुळे शेतीमधील समस्या गंभीर बनल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले. गेल्या काही वर्षांत देशामधील कृषी विकास खुंटला आहे. यासाठी दुसऱ्या हरितक्रांतीची गरज व्यक्त करून डॉ. जाधव म्हणाले, ११व्या पंचवार्षिक योजनेमध्ये कृषी क्षेत्राकडे विशेष लक्ष दिले आहे.

शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जमाफीने शेतीचे सर्व प्रश्न सुटणार नाहीत. शेती हे सामाजिक विकासातील सर्वांत मोठे आव्हान समजून त्यावर काम करावे. विकासाला 'मानवी चेहरा' देण्याचा प्रयत्न व्हावा.महागाई आणि

अन्नटंचाईच्या प्रश्नावर डॉ. जाधव म्हणाले, जैव इंधनासाठी जागतिक पातळीवर अनेक देश अन्न उत्पादनाची जमीन वापरत असल्याने अन्नाचा तुटवडा निर्माण झाला आहे. भारतातील महागाईची परिस्थिती जागतिक तुलनेत नियंत्रित असल्याचेही त्यांनी सांगितले.



मॅगसेसे पारितोषिक विजेते ज्येष्ठ पत्रकार पी. साईनाथ यांनी महाराष्ट्राला 'शेतकऱ्यांची स्मशानभूमी' असे संबोधले आहे. हे विधान चुकीचे व दिशाभूल करणारे आहे, असे सांगताना जाधव यांनी महाराष्ट्र व इतर राज्यांत लोकसंख्येच्या आधारावर केलेले विश्लेषण सादर केले. यामध्ये कर्नाटक, केरळ, गोवे, पॉंडिचेरी या प्रदेशात लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये झालेल्या आत्महत्यांचे प्रमाण पाहिल्यास ते महाराष्ट्रापेक्षा अधिक आहे. राज्यात २० टक्के शेतकरी आत्महत्या करतात. यामध्ये विदर्भाची परिस्थिती अधिक गंभीर आहे. पुरोगामी महाराष्ट्रास ही स्थिती लांच्छनास्पद आहे, असेही ते म्हणाले.


## डॉ. जाधव म्हणाले...

- **१६ वर्षांत विकासदर ९.३ टक्क्यांपर्यंत पोहोचला, परकीय चलन ३०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त झाले.**
- **खासगीकरण, उदारीकरण, निर्गुंतवणूक यामुळे अर्थकारणाची आयाम बदलले.**
- **असंतुलित विकासामुळे 'आहे रे – नाही रे' यातील दरी वाढल्याने सामाजिक स्थैर्य धोक्यात**
- **शेतीवरील अतिरिक्त लोकसंख्या कमी व्हावी, सेवा व उद्योग क्षेत्रात सामावून घेतले जावे.**

## ...युकेशन डिरेक्टरी'चे ...ुलगुरूंच्या हस्ते प्रकाशन

'मिडीया फॉर यू' या संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात ...ालेल्या एज्युकेशन डिरेक्टरीचे प्रकाशन पुणे विद्यापीठाचे ...लगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते नुकतेच झाले. संस्थेचे ...मुख अविनाश गवई यांनी या डिरेक्टरीचे संपादन केले ...ाहे.

याबाबत संस्थेने दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, ...ुण्यामध्ये दहा लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. ...ांना विद्येच्या या माहेरघरातील शैक्षणिक संधींची एकत्रितपणे ...हिती उपलब्ध होत नाही. त्याचप्रमाणे कोणकोणत्या



## कॉलेज डायरी

...भ्यासक्रमासाठी, विषयांसाठी कोणत्या संस्था उपयुक्त आहेत, ...ा अंदाज नसतो. म्हणूनच या डिरेक्टरीची संकल्पना पुढे ...ली. त्यामध्ये संस्थेचा तपशील, इतिहास, संपर्काचे पत्ते, ...ांचे मार्गदर्शन आली तपशील उपलब्ध करून देण्यात आला ...े. देशातील कोणत्याही शहरामध्ये ही डिरेक्टरी उपलब्ध ... शकेल.

चिंतन इमेज मकर्स




एज्युकेशन डिरेक्टरीचे प्रकाशन करताना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव (उजवीकडे) आणि अविनाश गवई.

PUNE UNIVERSITY

# No increase in exam fees for next two yrs

## Vice-Chancellor announces several development plans

**REPORTER**
reporters@sakaltimes.com

**Pune:** University of Pune (UoP) Vice-Chancellor Narendra Jadhav announced that there will be no increase in the exam fees for all the courses for the next two years.

"The Board of Examination of the UoP has surplus money, so there is no need to increase the fee structure for the next two years," said Jadhav here on Friday.

He also announced that the syllabus of all the 13 subjects of Arts for the first year undergraduate and postgraduate courses has been changed from this academic year. "The syllabus of almost 222 subjects has been changed till now and the revised syllabus will be uploaded on the website soon," Jadhav said.

Plans to standardise the textbooks for the UoP courses are also on. More than 800 meetings were held by the experts to change the syllabus, he said.

He announced that rules for pursuing the PhD, M Phil and for selecting a guide for PhD will be changed. "A committee has been set to take a review of all these and then the revision will be done," he said.

Colleges will also have semester system for the postgraduate courses from now on; almost all colleges affiliated to the UoP have PG courses. Over 146 proposals from different colleges for the affiliation were approved in the academic council meeting in the campus and almost 23 colleges have got permanent affiliation. Out of the total 474 colleges affiliated to the UoP, only 25 per cent have permanent affiliation.


Distance education system will be introduced which will benefit over 60,000 students who take admission for the courses as it will be a combination of web-based education and main line education.

In the next six weeks, there will be a meeting of the education council in which decision on subject list of the UoP and the UGC will be made, as the lists are different at present.

The meeting of academic council will be also held more regularly from now on as there will be more coordination amongst council members. In the same way the management council meeting will also be held every month henceforth.

Standardised textbooks for varsity courses will be released soon, said Jadhav.

The board of examination had recommended a hike in fees by 5 per cent, which used to be 10 per cent, but Jadhav rejected the recommendation.



### NEW INITIATIVE

- The syllabus of all the 13 subjects of Arts for the first year undergraduate and postgraduate courses has also been changed from the current academic year.
- Plans to standardise textbooks for the UoP courses are also underway.
- Rules for pursuing PhD and M Phil as well as selecting the guide for PhD are being changed

Sakal Times
चिंतन इमेज मेकर्स 13/5/08

# 'अन्वेषण संशोधन स्पर्धा' शनिवारपासून

पुणे, दि. १४ (प्रतिनिधी) : विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी १७ ते १९ मे रोजी राष्ट्रीय स्तरीय 'अन्वेषण संशोधन स्पर्धा'चे आयोजन पुणे विद्यापीठात करण्यात आले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन 'आयसर' संस्थेचे संचालक डॉ. के. एन. गणेश यांच्या हस्ते सकाळी साडेदहाला नामदेव सभागृहात आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. जाधव राहणार आहेत.

मूलभूत विज्ञानामधील अभियांत्रिकी, कृषी, आरोग्य विज्ञानामधील औषधनिर्माण व वैद्यकशास्त्र आणि मानव्यभाषेतील वाणिज्य आणि व्यवस्थापन या विभागांतर्गत ही स्पर्धा होणार आहे. यासाठी १२५ शाखेतील विविध प्रकल्प सादर केले जाणार आहेत. स्पर्धेसाठी रांची, नागपूर, हैदराबाद येथील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

प्रत्येक भाषेतील तीन विजेत्यांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहेत. यासाठी १८ मे रोजी टाय फाउंडेशनच्या वतीने धनंजय दातार व प्रमिता किर्लोस्कर यांनी उद्योजकांबरोबर परिसंवादाचे आयोजन केले आहे, अशी माहिती अन्वेषणाचे समन्वयक डॉ. पंडित विद्यासागर यांनी दिली.

लोकमत 15/5/08

# Prof makes software to manage colleges

TIMES NEWS NETWORK

**Pune:** A physics professor from Malegaon in neighbouring Nashik district has developed a 'unique' software for management of academic and administrative works at educational institutions.

Named Vriddhi, the software can also be used in establishing an integrated network of colleges under the University of Pune (UoP) area to bring in a uniformity in academic and administrative transactions. Both, within an institution and between the college and the university, state government and the University Grants Commission.

It may be mentioned here that the UoP is already working on a 'Triple connectivity' project that aims at linking the post-graduate departments on the university campus, the affiliated colleges and recognised institutions and the UoP administration through an online network. For this, a mother server is proposed to be set up on the university campus and central servers at individual colleges.

Vice-chancellor Narendra Jadhav has already evinced a keen interest in the software developed by Upendra D. Lad, w[illegible]ads the department of phys[illegible]at the Maharaja Sayajirao Gaikwad college at Malegaon, for using the triple connectivity project.

The software will be formally launched in the evening on May 17 during a ceremony at the Yashwantrao Chavan Academy of Development Administration in the presence of Jadhav and his counterpart from the Swami Ramanand Teerth Nanded University K.M. Kulkarni.

Speaking to TOI, Lad explained that, unlike the need-based software developed by the vendors for individual institutions, Vriddhi has no limitations when it comes to changing the settings and customising the requirements by the end-user to suit their purpose.

"We have developed different modules as part of this software that take care of tasks ranging from students' admission; employees pay roll and service records; library works; financial and accounting systems; hostel management; stock inventory control and online public access control, which serves as an online inquiry centre for students," Lad said. "An interactive voice response system (IVRS) is also being included as part of the new software package," he added.

Times of India 17/5/08

# जाधव, कदम यांना सामाजिक कृतज्ञता पुरस्कार





पुणे, दि. १७ (प्रतिनिधी) – जनसेवा व्यक्तिविकास प्रतिष्ठान व बौद्ध समाजसेवा मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कृतज्ञता पुरस्कार २००८ कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, भारती विद्यापीठाचे कार्यवाह विश्वजित कदम यांना यंदाच्या वर्षी प्रतिष्ठानच्या वतीने मुकेश धिवार यांनी जाहीर केले आहेत. त्याचे वाटप १७ रोजी सायं. ७.०० वा. अरणेश्वर विद्यामंदिर, पद्मावती, पुणे ९ येथे करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी भाई वैद्य व ॲडव्होकेट विकास देशपांडे हे असून प्रमुख उपस्थिती – ॲड. अभय छाजेड, मोहन जोशी, सुभाष जगताप, आबा बागूल, अश्विनी कदम, अशोक हरणावळ इ. नगरसेवक व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पुणे शहरातील नागरिकांच्या वतीने विविध क्षेत्रांत देदीप्यमान कार्य करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार देण्यात येतो.

१७पीएच१.जेपीजी कॅप्शन – मा. श्री. ॲड दादासाहेब बेंद्रे यांचे हस्ते पंडित दीनदयाळ उपाध्यक्ष पुरस्कार स्वीकारत असताना विद्याधर नारगोलकर, सोबत संस्थेचे अध्यक्ष मिलिंदराव एकबोटे.

पुण्यनगरी 18/5/08

# विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक गुणवत्तेची गरज : डॉ. जाधव

**पुणे** (प्रतिनिधी) : आजूबाजूची परिस्थिती झपाट्याने बदलत असून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे, त्यासाठी स्पर्धात्मक गुणवत्तेची गरज असल्याचे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

'करिअर महोत्सव २००८' चे उद्घाटन डॉ. जाधव यांच्या हस्ते झाले.त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हाधिकारी प्रभाकर देशमुख, डॉ. कृष्णकांत कुदळे, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण परिषदेचे अध्यक्ष विजय कोलते, शिक्षण मंडळाचे अध्यक्ष महेश लडकत, उपाध्यक्ष अप्पा रेणुसे, सुहास जोग, माजी महापौर अंकुश काकडे कृषि उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष जी.डी.देशमुख उपस्थित होते.

यावेळी '२००८ करिअर ड्रीम्स' च्या अंकाचे प्रकाशन डॉ. जाधव यांच्या हस्ते झाले. 'झी' मराठीचा उत्कृष्ट बालकलाकार हा पुरस्कार मिळालेला शरद गोयेकर( टिंग्या), प्रिया पाटील, वृषसेन दाभोळकर, अक्षयराज कोरे व चैतन्य हास्ययोग मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल काटे यांचा विशेष पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी प्रभाकर देशमुख यांना पंतप्रधान कार्यालयाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल, सिंहगड इन्स्टिट्यूटच्या डॉ. सुनंदा नवले व प्रा. आबेदा इनामदार यांनाही कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे.

देशमुख म्हणाले, आजही प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असूनही त्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होईल, तसेच २००६-०७ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात राबवलेल्या शाहू सर्वांगीण शिक्षण अभियानाची माहिती देऊन ग्रामीण भागातील शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी हे अभियान राबविल्याचे सांगितले. मुलांचा भावनिक विकास व सामाजिक जाणीव निर्माण करून विकास करणे महत्त्वाचे आहे.

प्रास्तविक रवी चवधरी यांनी केले. आभार गायत्री चवधरी यांनी मानले.

पुढारी 18/5/08

# शिक्षणाचा दर्जा सुधारणे गरजेचे

## प्रभाकर देशमुख : ग्रामीण विद्यार्थी संधीपासून वंचित

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. १७ : ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धेत टिकण्यासाठी प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा सुधारणे गरजेचे आहे, असे मत जिल्हाधिकारी प्रभाकर देशमुख यांनी शनिवारी व्यक्त केले.

पुणे संस्कृती वैभव ट्रस्ट व ड्रिम्स टेलिफिल्म्स पब्लिकेशनतर्फे आयोजित 'करिअर महोत्सवा'चे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून देशमुख बोलत होते. या वेळी पुणे महापालिका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष महेश लडकत, उपाध्यक्ष अप्पा रेणुसे, पुणे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष कृष्णकांत कुदळे, कृषी शिक्षण आणि कृषी परिषदेचे उपाध्यक्ष विजय कोलते, प्रा. सुहास जोग, माजी महापौर अंकुश काकडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक बी. जे. देशमुख उपस्थित होते.

देशमुख म्हणाले, "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्षमता असते; पण त्यांना संधी न मिळाल्याने त्यांच्यातील क्षमता वाया जाते. ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे."


कुलगुरू डॉ. जाधव म्हणाले, "स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना भरपूर संधी उपलब्ध आहेत. या संधीचा फायदा विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे."

जिल्हाधिकारी देशमुख, सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले, बालकलाकार शरद गोयेकर, वृषसेन दाभोलकर, आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू अक्षयराज कोरे, चैतन्य हास्य योग मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल काटे यांचा विशेष सत्कार या वेळी करण्यात आला. या वेळी 'करिअर ड्रीम' विशेषांकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविक महोत्सवाचे मुख्य संयोजक रवी चौधरी यांनी केले. महोत्सवात शैक्षणिक व व्यावसायिक संधींची माहिती देणारे प्रदर्शन, व्याख्याने, चर्चासत्रे यांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शन उद्या (रविवार) सकाळी नऊ ते रात्री आठ वाजेपर्यंत विनामूल्य खुले आहे.

सकाळ 18/5/08

चिंतन इमेज मेकर्स



राष्ट्रीय स्तरावरील अन्वेषण-२००८चे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते शनिवारी झाले.

# 'विद्यार्थ्यांच्या संशोधनाला वाव देण्याचे प्रयत्न व्हावेत'

**पुणे, दि. १७ (प्रतिनिधी) - विविध पातळीवर संशोधन महत्त्वाचे असून संशोधनाचे आव्हान स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या संशोधनाला वाव देण्याचे प्रयत्न केले पाहिजेत, असे मत आयसर संस्थेचे संचालक डॉ. के. एन. गणेश यांनी आज येथे व्यक्त केले.**

राष्ट्रीय स्तरावरील अन्वेषण-२००८ चे उद्घाटन डॉ. के. एन. गणेश यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. ए. आय. यू. चे संचालक डॉ. दयानंद डोणगावकर, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव या वेळी उपस्थित होते. महाविद्यालयीन तसेच विद्यापीठ पातळीवरील विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील 'अन्वेषण २००८' चा प्रारंभ झाला.

महाविद्यालयीन आणि विद्यापीठ पातळीवरील विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी गेल्या वर्षापासून राज्यपातळीवर सुरू करण्यात आलेल्या आविष्कार स्पर्धेत पुणे विद्यापीठाला सलग दोन वर्षे सर्वसाधारण विजेतेपद मिळाले. पुणे विद्यापीठाच्या या यशाची दखल नवी दिल्ली येथील अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ यांनी घेतली; आणि राष्ट्रीय स्तरावरील अन्वेषण स्पर्धा आयोजित करण्याची संधी विद्यापीठाला मिळाली. ही विद्यार्थी संशोधन स्पर्धा एकोणीस मेपर्यंत होणार असून १२५ विविध शाखांतील प्रकल्पांचे सादरीकरण येथे करण्यात येणार आहे.

याप्रसंगी बोलताना डॉ. डोणगावकर म्हणाले की, पुणे हे शिक्षणाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे गणले जात आहे. त्यामुळे संशोधनाला तितकेच महत्त्वाचे स्थान आहे. अन्वेषण स्पर्धेतून यशस्वी ठरलेल्यांना रोख पारितोषिके दिली जातील. स्पर्धेच्या काळात संशोधनाला चालना देण्यासाठी व्यापकतेचे प्रयत्न होणे आवश्यक आहे.

प्रभात
18/5/08




पुणे वैभव सांस्कृतिक ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात आलेल्या करिअर महोत्सवाचे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुनंदा नवले, सुहास जोग, कृष्णकांत कुदळे, रवी चौधरी, अंकुश काकडे उपस्थित होते.

# स्पर्धेत टिकण्यासाठी प्राथमिक शिक्षण महत्त्वाचे - जिल्हाधिकारी

पुणे. दि. १७ (प्रतिनिधी) - प्राथमिक शिक्षणातून विद्यार्थ्यांची पायाभरणी चांगली झाली तरच तो स्पर्धेत टिकू शकतो. त्यासाठी प्राथमिक शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. असे पुण्याचे जिल्हाधिकारी प्रभाकर देशमुख यांनी सांगितले.

पुणे सांस्कृतिक वैभव ट्रस्टतर्फे आयोजित करिअर महोत्सव २००८ चे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले. त्यावेळी जिल्हाधिकारी देशमुख बोलत होते. महापालिका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष महेश लडकर, उपाध्यक्ष अप्पा रेणुसे, पुणे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष कृष्णकांत कुदळे, प्रा. सुहास जोग, महाराष्ट्र कृषी शिक्षण परिषदेचे उपाध्यक्ष विजय कोलते, माजी महापौर अंकुश काकडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक बी. जे. देशमुख याप्रसंगी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी देशमुख म्हणाले, गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे गरजेचे आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात सर्वकष शिक्षण हा उपक्रम राबविला. त्यामुळे कोल्हापूरमधील शाळांचे स्वरूपच पालटले. त्यामुळे येत्या जून २००७ पासून हा प्रयोग राज्यभर राबविण्यात येणार आहे.

कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, आजुबाजूची परिस्थिती बदलत आहे. सर्वांगीण विकास होत असताना त्या टिकण्यासाठी स्पर्धात्मक गुणवत्ता हा सर्वात महत्वाचा निकष आहे.

जिल्हाधिकारी देशमुख सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या सचिव डॉ. सुनंदा नवले, चैतन्य हास्य योग मंडळाचे अध्यक्ष विठ्ठल काटे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. टिंग्या चित्रपटातील बाल कलाकार शरद गोयेकर, वृषसेन दाभोळकर आणि बुद्धीबळपटू अक्षराज कोरे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. एमआयटीमधील-विद्यार्थीनी प्रियांका पाटील हिने शहरातील बेशिस्त वाहतुकीवर संगणकाद्वारे सादरीकरण केले. संयोजक रवी चौधरी यांनी प्रास्ताविक केले. बालगंधर्व मंदिराच्या आवारात हा महोत्सव उद्या (दि. १८) पर्यंत सुरू राहणार आहे.

सामना 18/5/08

चिंतन [illegible] मकर्स

# 'पुण्यातील पुरस्कार मिळाल्याचा अभिमान'

**पुणे, दि. २१ (प्रतिनिधी) :** "मी पुण्यातील असल्यामुळे येथील पुरस्कार मला सर्वांत जवळचा आहे. माझ्या कारकिर्दीच्या सुरुवातीला हा पुरस्कार मिळाल्याचा मला अभिमान वाटतो, अशा शब्दांत संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.


अभियान प्रतिष्ठानच्या वतीने ज्येष्ठ नटश्रेष्ठ चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते डॉ. कुलकर्णी यांना 'पुणेरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव होते. शिक्षण मंडळाचे अध्यक्ष महेश लडकत, त्रिदल संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, पुण्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अण्णा थोरात, महाराष्ट्र युवा परिषदचे अध्यक्ष रणजित बाबर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश पवार आणि कार्याध्यक्ष विनायक धारणे उपस्थित होते.

याप्रसंगी अरुण पारगावकर, भानुप्रताप बर्गे, डॉ. अभिजित जोशी, जयवंत पाटील, शिवाजीराव चमकिरे, हर्षल वैद्य, आस्ताद काळे, शरद मोरे, अविनाश कलाटे, अॅड. संभाजी थोरवे आणि अस्मिता सतपती यांना 'पुणे कार्यरत्न पुरस्कार' देण्यात आला.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, "पुणेकर रसिकांनीच मला मोठे केले आहे. तुमच्या आशीर्वादामुळेच मी संगीत क्षेत्रात चांगले काम करत आहे. लहान मुलांमध्ये मला परमेश्वर दिसतो. त्यांच्या निरागस चेहऱ्याकडे पाहिल्यावर आपोआप गाण्यावर चाल सुचते. मला त्या मुलांकडून सतत काहीतरी शिकायला मिळते आणि रचना करताना प्रोत्साहन मिळते."

कोल्हटकर म्हणाले, "संगीतामधील नवीन बदल चांगले आहेत, ते आत्मसात करणे आवश्यक आहे. मात्र त्यामुळे जुन्या कलाकारांनी संगीतक्षेत्रात जे योगदान दिले त्यांना विसरता कामा नये. तोच मार्ग सलीलने आजच्या पिढीला दाखवावा."

अभिजित खांडकेकर यांनी सूत्रसंचालन केले तर प्रदीप भोसले यांनी आभार मानले.




'अभियान प्रतिष्ठाना'तर्फे दिला जाणारा 'पुणेरत्न पुरस्कार' बुधवारी पुण्यात संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. या प्रसंगी (डावीकडून) पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर आणि डॉ. कुलकर्णी.

लोकमत २५/६/०८



अभियान प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा पुणेरत्न पुरस्कार ज्येष्ठ नाट्य कलावंत चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांना देण्यात आला. या वेळी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. सतीश देसाई आदी उपस्थित होते. (छाया : सतीश निर्मळ)



कै. द. आ. शिंदे स्मृती प्रतिष्ठान पुणे यांच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा २००८ चा महाराष्ट्र राज्यस्तरीय 'साहित्य' पुरस्कार जळगाव जिल्ह्यातील वरणगाव येथील पत्रकार, लेखक साहित्यिक अनिल परदेशी यांना पुणे विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. (छाया – निलेश पवार)

पुण्यनगरी


चिंतन इमेज मेकर्स

सम्राट २७/६/०८

# MSc admissions to be centralised

## Initially, UoP Will Implement The New System In 12 Colleges

TIMES NEWS NETWORK



STARTING ANEW

**Pune:** In a move that would relieve scores of aspirants from appearing for multiple entrance tests, the University of Pune (UoP) has decided to introduce a centralised admission process for the post-graduate (PG) science courses at its affiliated colleges from 2008-09.

"In the initial year, the scheme is being implemented at 12 colleges that have given their consent for participating in the process," UoP vice-chancellor Narendra Jadhav told TOI. The university's management council, which met on Wednesday, cleared the scheme, he said.

A three-member committee of UoP senate, headed by Sambhaji Pathare, was earlier assigned to go into the issue after the university received demand from several quarters for introducing a centralised admission process for PG science courses. Sureshchandra Bhosale and Atul Bagul were the other two members.

On Wednesday, the committee submitted an interim report recommending centralised admissions.

Jadhav said that, each year, PG science aspirants are required to appear in over a dozen of entrance tests at individual college level, which invariably consumes valuable time as well as money besides leading to undue hassles. The management council decided to act on the panel's interim report and remove this problem to a certain extent.

Over the next one week, the panel will chart out a course for implementation of the centralised admission scheme, Jadhav said. "Those who have given their consent will be part of the exercise in the upcoming admissions," he said and added that he would personally write letters to other affiliated colleges, offering PG science programmes, urging them to be part of the centralised system.

Times of India
2/5/08



■ कै. द. आ. शिंदे स्मृती प्रतिष्ठानाचा 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ शिल्पकार बी. आर. खेडकर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी (डावीकडून) विवेक शिंदे, नंदूअप्पा शिंदे, प्रवीण शिंदे, सुरेश हिरे व शरद आहेर.

# 'द. आ. शिंदे यांचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे'

**पुणे, दि. १ (प्रतिनिधी)** : कै. द. आ. शिंदे ऊर्फ शेठजी यांचे कार्य आपणा सर्वांसाठी दीपस्तंभाप्रमाणे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणाऱ्या पुरस्कारामुळे पुरस्कार्थींना निश्चितपणे अधिक चांगले कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

कै. द. आ. शिंदे ऊर्फ शेठजी यांच्या जन्मशताब्दी दिनानिमित्त कुंभार समाजातील व्यक्ती व संस्था यांना विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्र राज्यस्तरीय 'कै. द. आ. शिंदे स्मृती पुरस्कार' देऊन डॉ. जाधव यांच्या हस्ते गौरविण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी कुंभार महासंघाचे अध्यक्ष सुरेश हिरे उपस्थित होते. कुंभार समाजातील पहिला जीवनगौरव पुरस्कार डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते शिल्पकार बी. आर. खेडकर यांना प्रदान करण्यात आला. एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या या पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी महाराष्ट्रातून कुंभार समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी अध्यक्ष सुरेशराव हिरे, कुंभार समाज महासंघाचे कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर नंदू ऊर्फ अप्पा शिंदे यांचीही भाषणे झाली. सुधीर चांदेकर यांनी प्रास्ताविक केले. विवेक शिंदे यांनी आभार मानले.

पुरस्कारविजेते पुढीलप्रमाणे : जीवनगौरव : शिल्पकार बी. आर. खेडकर (पुणे), सामाजिक संस्था : सामाजविकास संस्था धुळे, सामाजिक कार्य : विश्वनाथ कोलमकर (नांदेड), राजकीय कार्य : शरदराव वि. आहेर (ओझर मिग, नाशिक), वैद्यकीय क्षेत्र : शशिकांत मारुती कुंभार (खटाव, जि. सातारा), कलाक्षेत्र : रमेश बळीराम बिडकर (कोल्हापूर), क्रीडाक्षेत्र : कुमार आदित्य सांगवेकर (ठाणे), साहित्य : अनिल घनश्याम परदेशी (जळगाव), पत्रकारिता : शशिकांत मारुती कुंभार (पनवेल), शिक्षण : केरू डोखे (पारनेर), उद्योग : देवराम कापडे (बुलडाणा), आदर्श माता : सुगंधाताई शंकरराव जाधव (पुणे).

सामना
2/5/08

चिंतन इमेज मेकर्स


# प्रवेशाची 'नो' चिंता
# विद्यापीठात करिअर महोत्सव

**पुणे, दि. २९ (प्रतिनिधी)- बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मुले आणि पालक यांच्यासमोर अनेक समस्या उभ्या राहतात. या समस्येवर मात करण्यासाठी पुणे विद्यापीठाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.**

प्रवेश पद्धती, प्रवेश क्षमता, वसतीगृह, शिष्यवृत्ती, अभ्यासक्रम अशा विविध बाबींची माहिती देणारे आणि शंकाचे निरसन करणारे 'करियर महोत्सव आणि एज्युकेशन फेअर' विद्यापीठाच्या प्रांगणावर दि. ११ ते १३ जून या कालावधीत आयोजिण्यात येणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. या महोत्सवात विद्यापीठ, विविध शैक्षणिक संस्था, विद्यार्थी संघटना यांचे एकूण दोनशे स्टॉल असणार आहेत.

यात सुधा मूर्ती, डॉ. गणेशन, अविनाश धर्माधिकारी, अरुण बोंगिरवार, नितीन करीर, संजय चहांदे, विश्वास नांगरे पाटील यांच्यासह विद्यापीठातील 'डीन' मुलांशी सायन्स, कॉमर्स, आर्ट्स, स्पर्धा परीक्षा अशा अनेक विषयांवर संवाद साधतील. अशा प्रकारचा महोत्सव विद्यापीठाच्या वतीने प्रथमच होत असून विद्यार्थ्यांना आणि पालकांना एका छताखाली सर्व काही माहिती मिळेल, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

प्रभात 30/5/08



कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांच्या कार्यालयात फुलांचा वर्षाव झाला.

# शुभेच्छांच्या वर्षावातून व्यक्त झाला आदरभाव

**पुणे, दि. २९ (प्रतिनिधी)- असंख्य विद्यार्थ्यांनी, विद्यार्थी संघटनांनी शुभेच्छापत्रे, फुले, पुष्पगुच्छ देऊन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांचा ५५ वा वाढदिवस आज मोठ्या आनंदाने साजरा केला.**

पहाटेपासूनच कुलगुरूंच्या निवासस्थानी आणि कार्यालयाजवळ विद्यार्थ्यांची गर्दी होती. प्रत्येकांच्या हातात शुभेच्छपत्रे आणि फुलांचे गुच्छ होते. विद्यार्थ्यांशिवाय विविध संस्थांचे प्रतिनिधी, पदाधिकारी यांनीही कुलकुरूंची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

## *कुलगुरूंचे ध्येय कायम*

वाढदिवसानिमित्ताने बोलताना कुलगुरू म्हणाले, पुणे विद्यापीठाला जागतिक स्तरावर नेण्याचे माझे ध्येय आहे. आजही हे ध्येय कायम आहे आणि ते मी पूर्ण करणारच. अनेक नवे, अभ्यासक्रम, नव्या योजना, नवे विषय अशा अनेक माध्यमातून विद्यापीठात बदल करण्याचा प्रयत्न करीत आहे.

प्रभात 30/5/08

# पुणे विद्यापीठातील विद्यार्थीसंख्या पाच वर्षांत १० लाखांवर नेणार

## कुलगुरूंचा वाढदिवशी संकल्प

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) - पुणे विद्यापीठाचा कारभार सुधारला जाऊ शकत नाही, त्यासाठी पुणेकर तुम्हाला सहकार्य करणार नाहीत, असे सांगणाऱ्यांची तोंडे बंद करून आजपर्यंत केलेल्या कामाबद्दल आपण पूर्णतः समाधानी असल्याचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले. येत्या ५ वर्षांत विद्यापीठातील विद्यार्थ्यांची संख्या १० लाखांपर्यंत पोहचविण्याचा संकल्पही [illegible] आपल्या वाढदिवशी व्यक्त केला.



कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त आज विद्यापीठासह शैक्षणिक, सामाजिक व विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी त्यांचे अभीष्टचिंतन केले. कुलगुरूंनी या शुभेच्छा स्वीकारल्या. कुलगुरुपदाच्या आतापर्यंतच्या कारकीर्दीबद्दल आपण समाधानी असून, पुणे विद्यापीठाला समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहचविण्याचा आपला प्रयत्न असल्याचे डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले. संरक्षण क्षेत्रातील जवान, कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात रोजगार [illegible]सह येत्या ५ वर्षांत विद्यार्थीसंख्या १० लाखांवर नेण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

पुढारी 30/5/08

चिंतन इमेज मेकर्स

# Move to bifurcate UoP sets off fresh debate

## Vice-Chancellor Narendra Jadhav Is Averse To The Idea; Other Education Experts Welcome Proposal

Vishwas Kothari | TNN

**Pune:** A fresh debate is brewing in the academic circles here over the state government's latest proposal that envisages bifurcation of the universities of Pune, Mumbai and Nagpur into two entities on the grounds that the existing system had become too unwieldy for efficient functioning.

According to the proposal, the University of Pune (UoP), which has its control spread over Pune, Ahmednagar and Nashik districts, would split into University of Pune (covering Pune city and district) and the University of Pune, Ahmednagar (covering Ahmednagar and Nashik districts).

As of now, the UoP has 472 colleges affiliated to it and over 250 recognised institutions, totally accounting for more than 5 lakh students in all the three districts.

Post-bifurcation, nearly 200 affiliated colleges and 90 recognised institutions, located in Ahmednagar and Nashik districts, would fall under the newly carved out smaller entity, impacting close to 2 lakh students from these districts.

There are issues of students from Ahmednagar and Nashik losing the advantage that accrues from the UoP's brand equity. However, the proposed split is expected to facilitate better administrative, financial and academic handling of matters under the new smaller entities.

The question being asked is whether splitting larger universities is the only viable solution? The National Knowledge Commission (NKC) has said that unwieldy universities in order to be efficient and sensitive to the needs of the stakeholders, ought to be trimmed into smaller entities.

However, speaking to TOI on Thursday, UoP vice-chancellor Narendra Jadhav said, "I don't think size is a constraint. It can, in fact, be a strength if nursed through apt change of technology for handling the wide network of institutions." He said, the UoP had set out to achieve this through the triple connectivity project that envisages an online network of the affiliated colleges, recognised institutions, post-graduate departments and the UoP administration.

He pointed out that things haven't worked out the way they are being sought through the proposed split at the existing smaller universities in the state. For instance, the Solapur University, he said. "What we are working at is, an apt strengthening of the UoP sub-centres at Ahmednagar and Nashik by procuring 100 to 150 acre land and building infrastructure that can function as independent university campuses," he said.

Jadhav ruled out the prospect of the split taking effect from the forthcoming academic year. "The proposal is at a nascent stage and yet to come out of the files for discussion at the level of the vice-chancellors (V-Cs). We (the UoP) have neither made any suggestion to the government in this regard nor the latter has consulted us so far on this matter," he said.

Jadhav's predecessor and now advisor to the NKC, Ashok Kolaskar, said the move was right but wondered how it would impact Ahmednagar and Nashik if the state fails to adequately support the new entity. The government will have to provide an enabling set up to enable the new entity get into the academic aspects without wasting much time on issues of acquiring land and constructing new buildings. This had happened in the case of the UoP as the then governor had the foresight of extending a ready-to-run campus facility. A somewhat similar move would benefit the new smaller entity, Kolaskar said.


Kolaskar said, the newly carved entity would also be required to develop its own brand equity by focusing on newer programmes instead of plain replication of the existing UoP model. "They will have to bring in more culture of research rather than remaining an exam-taking body," he said. Also, the focus will have to be on catering to the strength of the respective areas. "The government should ask an expert panel to take the local viewpoint in establishing the new entity," he said.

Former University Grants Commission chairman Arun Nigavekar said that the existing higher education system had indeed become unwieldy and was impacting the governance as well as management of universities. "Creation of smaller entities empowered to give degrees and take administrative, financial and academic decisions is a definite requirement," Nigavekar said, adding that the ministry of human resource and development and the state education ministers had endorsed the UGC's suggestion in the past that autonomous colleges and the colleges with potential for excellence be granted an 'empowered status'. "This was to create mini-universities within the existing affiliating structure, i.e. the state university," he said. Somehow, the proposal did not come through.

Nigavekar said, splitting larger university was good but the logical step would be to empower colleges without disturbing the existing affiliating structure.

Gajanan Ekbote, member, UoP management faculty, said the split would ensure better control, regulation and monitoring of colleges and recognised institutions besides, enabling administrative, academic and exam reforms.

Sarjerao Nimse, UoP management council member and principal of New Arts Science and Commerce College, Ahmednagar, said, the move would be justified only when the government backs it up with financial and academic support. "It will present us the opportunity to create a brand equity of our own," he said.



According to the proposal, the University of Pune, which has its control spread over Pune, Ahmednagar and Nashik districts, would split into University of Pune (covering Pune city and district) and the University of Pune, Ahmednagar (covering Ahmednagar and Nashik districts)

Times of India
30/5/08

तन इमेज मेकर्स

# पुणे विश्वविद्यालय में 12वीं के छात्रों हेतु कैरियर महोत्सव 11 से

## डॉ. नरेंद्र जाधव द्वारा पत्रकार-वार्ता

- 304 करोड़ के कुल बजट में से 150 करोड़ विकासकार्यों पर खर्च
- साढ़े पांच लाख छात्र-छात्राएं कर रहे हैं अध्ययन
- महोत्सव में शामिल रहेंगे शिक्षा संबंधी 200 कक्ष



डॉ. नरेंद्र जाधव

पुणे, 30 मई (आ.प्र.)

पुणे विश्वविद्यालय द्वारा बारहवीं के छात्रों के लिये ग्यारह से तेरह जून के दौरान कैरियर महोत्सव व एजूकेशन केयर का आयोजन किए जाने की जानकारी पुणे विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव ने पत्रकार-वार्ता में दी.

उन्होंने बताया कि 400 एकड़ भूमि पर बने पुणे विश्वविद्यालय का बजट 304 करोड़ रुपए का है. उनमें से डेढ़ सौ करोड़ रुपए विकासकार्यों पर इस्तेमाल किए जाएंगे. पुणे विश्वविद्यालय के अंतर्गत साढ़े पांच लाख छात्र-छात्राएं महाविद्यालयीन शिक्षा ले रहे हैं. स्वयं उनके हाथों उक्त महोत्सव का उद्घाटन होगा. पुणे विश्वविद्यालय से संलग्न सभी पंजीकृत शिक्षा संस्थाएं इस महोत्सव में शामिल हो सकेंगी. विश्वविद्यालय के अंतर्गत विभिन्न विभागों के अलग-अलग कक्ष स्थापित किए जाएंगे. शिक्षा विषयक मार्गदर्शन करनेवाले दो सौ कक्ष इस महोत्सव में रहेंगे. पालक व छात्रों को जो जानकारी चाहिए वह अलग कक्ष से दी जाएगी. शिक्षा संस्था, महाविद्यालय व उनके पाठ्यक्रम की जानकारियां यहां प्रदर्शित की जाएंगी. प्रवेश पद्धति, प्रवेश क्षमता व होस्टेल की जानकारियां छात्रों को दी जाएंगी. मुख्य मंडप में चार समुपदेशन कक्ष स्थापित किए जाएंगे. विश्वविद्यालय के सभी चौदह विद्या शाखाओं के अधिष्ठाता व विभिन्न विषयों के विशेषज्ञ प्राध्यापक छात्रों से समुपदेशन करेंगे. महोत्सव के पहले दिन व्यवस्थापन, विधि, व्यावसायिक पाठ्यक्रमों की जानकारियां दी जाएंगी. दूसरे दिन सभी विज्ञान शाखा की जानकारियां दी जाएंगी. तीसरे दिन स्पर्धा परीक्षा विषय पर विशेष मार्गदर्शन दिया जाएगा. इस अवसर पर आयोजित परिसंवाद में आईएएस अधिकारी मार्गदर्शन प्रदान करेंगे.

उन्होंने आगे बताया कि विश्वविद्यालय द्वारा अमल में लाई जानेवाली विभिन्न योजनाएं, साथ ही छात्रवृत्तियों की जानकारियां महोत्सव में दी जाएंगी. बारह व तेरह जून को सुबह नौ से दोपहर तीन बजे तक 'ओपन डे' रखा गया है. छात्र इस समय में हर विभाग में घूमकर जानकारियां हासिल कर सकेंगे. यह महोत्सव सफल होने पर अगले वर्ष नासिक व अहमदनगर में भी इसका आयोजन किया जाएगा. यह भी कुलगुरु डॉ. जाधव ने स्पष्ट किया.


पत्रकार-वार्ता में कुलसचिव माणिक जाधव, छात्र कल्याण मंडल के प्रमुख डॉ. संभाजी पठारे व राष्ट्रीय सेवा योजना के प्रमुख डॉ. संजय चाकणे उपस्थित थे.

आज का आनंद 31/5/08

# पुणे विद्यापीठात ११ जूनपासून 'करिअर महोत्सव'

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) : पुणे विद्यापीठाच्या वतीने बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ११ ते १३ जून या कालावधीत 'करिअर महोत्सव व एज्युकेशन फेअर'चे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या पुढाकारातून प्रथमच असा उपक्रम राबविण्यात येत आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होईल. पुणे विद्यापीठाशी संलग्न सर्व नोंदणीकृत शिक्षणसंस्थांना या महोत्सवात सहभागी होता येईल. विद्यापीठांतर्गत असलेल्या विविध विभागांचे स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहेत. शिक्षणविषयक मार्गदर्शन करणारे सुमारे २०० कक्ष या महोत्सवात असतील. पालक व विद्यार्थ्यांना हवी असणारी सर्व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. शिक्षणसंस्था, महाविद्यालये व त्यांच्या अभ्यासक्रमांची माहिती या कक्षांमध्ये प्रदर्शित करण्यात येईल. प्रवेशपद्धती, प्रवेशक्षमता व



वसतिगृह यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येईल. मुख्य मंडपात चार समुपदेशन कक्ष उभारण्यात येणार असून, विद्यापीठाच्या सर्व १४ विद्याशाखांचे अधिष्ठाता व विविध विषयांचे तज्ज्ञ प्राध्यापक विद्यार्थ्यांना समुपदेशन करणार आहेत. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी व्यवस्थापन, विधी, व्यावसायिक या अभ्यासक्रमांची माहिती करून दिली जाईल. दुसरा दिवस विज्ञान शाखा व तीमध्ये असणाऱ्या संधींची माहिती करून देण्यासाठी असेल. तिसऱ्या दिवशी स्पर्धा परीक्षांविषयी विशेष मार्गदर्शन करण्यात येईल. यानिमित्ताने आयोजित परिसंवादात सनदी अधिकारी व मार्गदर्शक सहभागी होणार आहेत.

### अनुत्तीर्ण झालात तरीही...

बारावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याने निराश बनलेल्या किंवा कमी गुण मिळाल्याने भवितव्याविषयी चिंता करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक स्वतंत्र कक्ष या महोत्सवात असेल. अशा विद्यार्थ्यांना तज्ज्ञांमार्फत निःशुल्क मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कारकीर्द घडविण्याच्या नव्या वाटा, उपलब्ध संधी, चांगले अभ्यासक्रम यांची माहिती विद्यार्थी व पालकांना उपलब्ध होऊ शकेल.

विद्यापीठाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजना, तसेच शिष्यवृत्त्यांची माहिती करून देण्यासाठी स्वतंत्र कक्ष असेल. बारा व १३ जून या दिवशी सकाळी नऊ ते दुपारी तीनपर्यंत 'ओपन डे' ठेवण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विभागांत फिरून माहिती घेता येईल. हा प्रयोग यशस्वी ठरल्यास पुढील वर्षापासून नाशिक, नगर येथेही त्याचा विस्तार करण्यात येईल, असे डॉ. जाधव यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी कुलसचिव माणिक जाधव, विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रमुख डॉ. संभाजी पठारे व राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. संजय चाकणे हे उपस्थित होते.

लोकमत 30/5/08

# देशाच्या विकासासाठी सहकारी बँका आवश्यक : डॉ. जाधव

## जिजामाता बँकेला 'राजमाता जिजाऊ उत्कृष्ट बँक' पुरस्कार प्रदान

पुणे, दि. २ (प्रतिनिधी) – सहकारी बँकांनी सर्वसामान्य लोकांची सावकारी पाशातून मुक्तता केली असून, देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सहकारी बँकांची गरज असल्याचे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक्स् असोसएिशनच्या १२ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात जिजामाता महिला सहकारी बँकेला 'राजमाता जिजाऊ उत्कृष्ट महिला सहकारी बँक' पुरस्कार डॉ. जाधव यांच्या हस्ते देण्यात आला. बँकेच्या अध्यक्षा विजया शिरोळे व मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील खेडकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. त्या वेळी ते बोलत होते. सॉफ्टेक्सेल कन्स्लटंसी सर्व्हिसेसचे व्यवस्थापकीय संचालक अच्युत गोडबोले, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष माणिकराव पाटील, उपाध्यक्ष जगन्नाथ बिंगेवार, मानद सचिव डी. एम. मोहोळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वि. य. तराळे या वेळी उपस्थित होते.

सहकारी बँकांनी तळागाळातील लोकांना अर्थसाह्य केले आहे. त्यामुळे त्यांची सावकारी पाशातून मुक्तता होऊ शकली. देशाच्या विकासामध्ये सहकारी बँकांनी मोलाची भूमिका पार पाडल्यामुळे सहकारी बँकांची गरज आहे, असे डॉ. जाधव म्हणाले.

सहकारी बँकांनी नवीन तंत्रप्रणाली अवलंबून ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्याकडे लक्ष पुरवले पाहिजे, असे गोडबोले यांनी सांगितले. बँकेच्या अध्यक्षा विजया शिरोळे यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी डॉ. जाधव यांच्या हस्ते अन्य बँकांनाही पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. माणिकराव पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वि. य. तराळे यांनी सूत्रसंचालन केले, तर जे. एफ. बिंगेवार यांनी आभार मानले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. गणपत सहादू धापटे व इतर यांचे मालकी, कब्जे वहिवाटीची असून, आमचे अशिलांची सदर मालकांचे बरोबर सदर मिळकत खरेदी घेणे व विकसनाबाबत बोलणी व वाटाघाटी चालू आहेत. सदर मालकांनी सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असून त्यावर, कोणाचे काही हक्क, हितसंबंध, बोजे, गहाण, दान, बक्षीस, चोळीबांगडी, करारमदार, ताबा, वहिवाट, तबदिली, वारसाहक्क, तगाईकर्ज, पोटगी, विसार वगैरे अगर अन्य स्वरूपाचे

प्रभात 3/5/08

# विकास महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सहकारी बँका टिकण्याची गरज-डॉ.जाधव

**पुणे, दि. १ (प्रतिनिधी)- सहकारी बँकांनी तळागाळातील लोकांना अर्थसहाय्य केल्यामुळे त्यांची सावकारी पाशातून सुटका होऊ शकली. त्यायोगे देशाच्या विकासामध्ये मोलाची कामगिरी बजावणाऱ्या सहकारी बँका टिकण्याची गरज आहे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.**

जिजामाता महिला सहकारी बँकेला या वर्षीचा राजमाता जिजाऊ उत्कृष्ट महिला सहकारी बँक पुरस्कार डॉ. जाधव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्टेट को ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशनतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बँकेच्या अध्यक्ष विजया शिरोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील खेडकर, संगणक तज्ज्ञ अच्युत गोडबोले राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष मारीकराव पाटील, उपाध्यक्ष जगन्नाथ बिंगेवार मानद सचिव डी. एम. मोहोळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वि. य. तराळे आदी याप्रसंगी उपस्थित होते.

प्रभात 4/5/08

# डॉ. नरेंद्र जाधव यांना चव्हाण पुरस्कार प्रदान



पुणे, दि. ४ (प्रतिनिधी)- अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सुवर्णमहोत्सवी समारंभात पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांना कै. यशवंतराव चव्हाण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ५१ हजार रूपये व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

देशाच्या बँकिंग क्षेत्रात अतुलनीय कामगिरी केल्याबद्दल तसेच अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक, सामाजिक बांधिलकीतून काम करत असल्याबद्दल डॉ. जाधव यांना हा पुरस्कार केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते देण्यात आला. केंद्रीय उर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, मुख्यमंत्री विलासराव देशमुख तसेच सहकारमंत्री पतंगराव कदम, उर्जामंत्री दिलीप वळसे पाटील, कृषिमंत्री बाळासाहेब थोरात, वनमंत्री बबनराव पाचपुते व बँकेचे चेअरमन शंकरराव गडाख पाटील यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला.

प्रभात 5/5/08

# कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव को स्व. यशवंतराव चव्हाण पुरस्कार प्रदान

**पुणे, 4 मई (आ.प्र.)**

अहमदनगर जिला मध्यवर्ती सहकारी बैंक के स्वर्ण महोत्सवी समारोह के अंतर्गत पुणे विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव को आज स्व. यशवंतराव चव्हाण पुरस्कार अहमदनगर में केंद्रीय कृषि मंत्री श्री शरद पवार के हाथों प्रदान किया गया.



कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव को बैंकिंग क्षेत्र में अतुलनीय योगदान प्रदान करने व सामाजिक प्रतिबद्धता से देश सेवा करने के कारण स्व. यशवंतराव चव्हाण पुरस्कार प्रदान किया गया. इसके अंतर्गत 51 हजार रुपए व सम्मानचिन्ह, शाल, श्रीफल का समावेश है.

इस सम्मान समारोह में केंद्रीय मंत्री श्री शरद पवार के अलावा केंद्रीय ऊर्जामंत्री श्री सुशीलकुमार शिंदे, मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख, सहकारितामंत्री श्री पतंगराव कदम, ऊर्जामंत्री श्री दिलीप वलसे-पाटिल, कृषिमंत्री श्री बालासाहब थोरात, वनमंत्री श्री बबनराव पाचपुते, बैंक के चेयरमैन श्री शंकरराव गडाख-पाटिल उपस्थित थे.

आज का आनंद

उपक्रम

# प्रकाशाची बेटं

डॉ. संभाजी पठारे
डॉ. संजय चाकणे

आम्ही दोघे लासलगावच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या उद्घाटनासाठी निघालो होतो. नारायणगाव सोडल्यानंतर एक विद्यार्थिमित्र शेख सारखा फोन करून त्याच्या शिबिराला येण्यासाठी आग्रह करत होता. लासलगावचे शिबिर गाठायचे असल्याने, आम्ही त्याला नकार देत होतो. शेवटी त्याने एसएमएस करून 'सर, प्रयोग बघायला याच' अशी आग्रहपूर्वक विनंती केली. आम्ही त्याच्या विनंतीला मान देऊन धामणगाव पाट या गावी जायचे ठरवले. तिथे गेल्यानंतर अचंबित व्हावे लागले. १४० युवक-युवतींच्या मदतीने १० दिवसांत डॉ. सुरेश मालुंजकर यांनी आदिवासी बांधवांसाठी ३१० शौचालये बांधून तयार केली होती. 'सर, आम्ही गांधीगिरी केली.' 'काय केले?' विचारल्यावर त्याने सांगितले, ते उत्तर युवक समाजासाठी काय करू शकतो? याचे उत्तम उदाहरण वाटले. तो म्हणाला, 'सर, आम्ही पहिल्या रात्रीच्या पहाटे ३.३० ला उठलो. नंतर सडासंमार्जनासह गाव स्वच्छ केले. दारात पणत्या तेववल्या आणि घरातली माणसे उठायची अंगणातच वाट बघत बसलो. लोक उठल्यानंतर जसजसे बाहेर येऊ लागले, डबे भरून जायच्या तयारीत असताना डबेवाल्या माणसाला धरायचे! काका, मामा, मावशी थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा मारायच्या. (त्यांना प्रत्येकाला शौचाला जायची घाई असल्याने आमचे ऐकण्याच्या मनस्थितीत ते नव्हते.) काका, संडास बांधा की? ते म्हणाले, बांधतो की! त्यांनी जागा दाखवली आणि ते जायला लागले. आम्ही म्हणालो, तुम्ही शौच्याला जाईपर्यंत आम्ही खड्डा खोदतो. तुम्ही पहिली कुदळ मारा. त्यांना आमचे ऐकण्याशिवाय पर्याय नव्हता. एकजण म्हणाला. 'बाबा रे, पहिलं मला जाऊन येऊ दे!' अशा प्रकारे साम, दाम, दंड, भेद अशा येनकेनप्रकारेण आम्ही माणसांची मने शौचालय बांधण्यासाठी वळविली आणि बघता बघता गाव हागणदारीमुक्त झाले.'

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी समर्थ भारत अभियानाची कल्पना मांडली. डॉ. अरुण अडसूळ आणि आम्ही दोघांनी ती उचलून धरली आणि बघता बघता या अभियानाला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. ४७२ महाविद्यालयांनी मिळून पहिल्या तीन महिन्यांतच ५०० गावे समर्थ भारत अभियानासाठी दत्तक घेतली. १५ विविध आणि वैशिष्ट्यपूर्ण कृतिगट प्रत्येक गावासाठी महाविद्यालयांनी तयार केले. पाणीप्रश्न, आरोग्य, इतिहास, फलोरा-फौना, निर्मलग्राम, क्रीडांगण,

**पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या समर्थ भारत योजनेला एक वर्ष पूर्ण झाले. योजनेत खरोखरीच समाजोपयोगी कामे होत आहेत, की फक्त एक देखावा मांडला जात आहे, याबाबत अधिसभेतही चर्चा झाली. प्रत्यक्षात महत्वाची आहे ती संघभावना, सामाजिक बांधिलकीची प्रवृत्ती...**

ग्रंथालय इत्यादी. ५०० गावे एका झटक्यात बदलतील अशी आमची कोणाचीही अपेक्षा नव्हती. गरज होती ती माणसांनी आतून पेटून उठण्याची! मा. कुलगुरू आणि आमची टीम सातत्याने संस्थाचालक, पालक, विद्यार्थी, प्राध्यापक यांना भेटून योजना समजावत होतो. काहींनी ती पटकन उचलली. काहींनी फक्त समजावून घेतली. काहीजण झपाट्याने कामाला लागले. काहींनी असमर्थता दर्शविली. समर्थ भारत अभियानाला नुकतेच एक वर्ष पूर्ण होतेय. काही महाविद्यालयांनी पथदर्शी काम केले. होय, अंधारात मिणमिणता का होईना प्रकाशाचा आधार लागतो. चळवळीला स्वरूप येण्यासाठी 'प्रकाशाची बेटं' फार महत्त्वाची ठरतात. समर्थ भारतातली ही काही 'प्रकाशाची बेटं' आमच्यापर्यंत पोहोचलेली. काही अज्ञानात सुख मानणारी. (परवा एक प्राध्यापक आमच्या एका बैठकीला आले होते. मोहनराव देशमुख हा माणूस गेली २० वर्षे अहमदनगरमधली एक कॉलनी सकाळी ५.३०ला उठून झाडतो, 'ना प्रसिद्धी ना बडेजाव'.)



श्रीरामपूरचे आर.बी.एन.बी. महाविद्यालय, रयतेचा वारसा, दत्तक खेडे जळगाव, प्रा. सुनील चोळके, प्राचार्य म्हस्के यांनी सातत्याने पाठपुरावा करून गाव हागणदारीमुक्त केले. स्मार्ट कीड्स असा एक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला. सॉफ्ट स्किलच्या प्रयोगातून तयार झालेल्या विद्यार्थ्यांनी जळगावच्या तिसरी, चौथीच्या २० मुलांना रोज दोन तास असे तीन आठवडे प्रशिक्षण दिले आणि ही पोरं चुरुचुरु बोलायला लागली. फूड पॅकिंग युनिट, जिल्हा परिषदेच्या मदतीने पाणीपुरवठा नळयोजना, ४००० वृक्षांची लागवड व ती जगवण्यासाठी महिलांची स्पर्धा, आरोग्य तपासणी असे उपक्रम राबवून स्वच्छता अभियानात गाव पहिले आणले. नाशिक जिल्ह्याच्या टोकाला असणाऱ्या कळवण महाविद्यालयाने ककाणे गाव दत्तक घेतले होते. १० दिवसांत १०५ शौचालये बांधून पूर्ण केली. २५०० झाडे मानूर गावात जगवलेली पाहिली, की धन्यवाद द्यावेसे वाटतात ते रावसाहेब शिंदे आणि प्रा. खैरनार आणि मंडळींना! अमोल या विद्यार्थ्याने एक प्रयोग या गावात केला आहे. चुलीच्या वरच्या बाजूस लोखंडी नळाचा गोल आकार केला. एका बाजूने गार पाणी त्यात सोडायचे व दुसऱ्या बाजूने गरम पाणी अंघोळीसाठी तयार चुलीवर भांड ठेवायला या गोलाचा उपयोग होईल. शिवाय एकाच वेळी स्वयंपाक व पाणी गरम करणे, असे १६ चुलींना त्याने स्वतः बसवले. खरेतर याचे पेटंट घेता येईल इतके छान. उरलेल्या लोकांनी स्वतःच तयार करून घेतले. शिक्षण आणि समाज यांचे नाते जुळवणारा हा प्रयोग!

के.टी.एच.एम. महाविद्यालयाचे 'तिरडशेट' हे गाव. महाविद्यालयाने गावासाठी ॲम्ब्युलन्स घेण्यासाठी अनुदान मिळवले. आज ही ॲम्ब्युलन्स गावात अडल्यानडल्यासाठी उभी असते. डॉ. व्ही. बी. गायकवाड, प्रा. सावळे, प्रा. भंडारे यांचा गावात सातत्याने वावर असतो. गाव हागणदारीमुक्त होतंय, पण आदिवासी मुलांसाठी, बालकल्याणाच्या योजना, मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड असे प्रयोग त्यांनी केले.

विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय, बारामती यांचे कामच और आहे. 'मेडद' नावाचे गाव. चारी बाजूंनी मोठ्या प्रमाणात बाभळी वाढलेल्या. त्याच्याच आडोशाला सकाळी लोक बसायचे. डॉ. अडसूळ, प्रा. पाटील, प्रा. अवचर यांनी त्यावर घाला घालायचा ठरवला. गाव मोकळे झाले. लोकांनी एन.एस.एस.च्या मदतीने शौचालये बांधायचे ठरवले. गाव हागणदारीमुक्त होतंय. २५० झाडे कामठीच्या कुंपणाच्या मदतीने ६ फुटांच्या वर वाढवलीत. गावातली गढी जिचा दरवाजा गेल्या ५० वर्षांत उघडला नव्हता. अर्थात एकेकाळी सुबत्ता आणि सरदारकी असलेल्या याही गढीचा इतिहासच लोक विसरले होते. आज बारामतीला जाताना दिमाखदार तटबंदी असलेली गढी पाहून अचंबा वाटतोय. गावात एकी आणण्याचे काम आणि लोकप्रतिनिधींचा सहभाग करून घेतल्यास गाव विकसित होऊ शकतील याचाच हा प्रयत्न!

देवळा महाविद्यालयाने खुडे गावात प्राध्यापकांच्या वर्गणीतून ग्रंथालय उभे केले. गावचा रस्ता तयार होतोय. या महाविद्यालयाचे पाच प्राध्यापक याच गावचे असल्याने प्राचार्य आहेर, प्रा. ठाकरे यांना यश लवकर येत असल्याचे जाणवते.

शिरूरच्या सी.टी. बोरा महाविद्यालयाने अफलातून प्रयोग गावात केलेत. ७५ मुलींच्या मदतीने प्रा. जाधव यांनी घोडनदीची परिक्रमा केली. पाच गावांचा इतिहास, भौगोलिक माहिती प्रणालीच्या मदतीने मॅपिंग या मोहिमेत प्राचार्य नंदकुमार निकम यांनी नवीन रांजन खळग्यांचा शोध लावल्याचे सांगितले, समर्थ भारत अभियानांतर्गत आजपावेतो २१ गावांचा इतिहास लिहून झाला आहे. ३०० पेक्षा जास्त गावांचे गावसर्वेक्षण व २००० पेक्षा जास्त घरांचे कुटुंब सर्वेक्षण, १६ गावांचे जी.आय.एस. मॅपिंग, २३२ गावांमधून हागणदारीमुक्तीच्या कामातून ४६०० पेक्षा जास्त शौचालये, शोषखड्डे, सलग समपातळी चर, गटारी, नाले, बंधारे अशी श्रमाची नानाविध कामे केली. लावलेल्या ७ लाख रोपांमध्येच ६० टक्के झाडे जगल्याचा अंदाज आहे. काम किती झाले याला महत्त्व नाही, महत्त्व आहे ते माणसांना कामासाठी प्रवृत्त करणे, त्यांच्यात तेजाची ज्योत पेटवणे, जाणीवजागृती आणि अर्थात समाज आणि शिक्षण यांच्यातील दरी कमी करणे. गरज कशाची असेल तर समाजातील प्रत्येक घटकाने सकारात्मकतेने या योजनेकडे पाहून केवळ हे करा, ते करा, हे झाले पाहिजेपेक्षा हे मी केलंय, हे आम्ही केलं, हे कृतीतून सांगण्यासाठी सगळे एकत्र आले तर खेडी समर्थ होतील आणि समर्थ भारतासाठी ते पुरेसे आहे.

लोकसत्ता
8/5/08

चिंतन इमेज मेकर्स

## पुणे विद्यापीठ

# पुढील दोन वर्षांत परीक्षा शुल्कात वाढ नाही

## डॉ. नरेंद्र जाधव : विद्या परिषदेच्या बैठकीत शिक्कामोर्तब; अभ्यासक्रमांत बदल होणार

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. ९ : येत्या दोन वर्षांत विद्यापीठाच्या परीक्षा शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ न करण्याच्या निर्णयावर विद्या परिषदेच्या बैठकीत शुक्रवारी शिक्कामोर्तब करण्यात आले. दर वर्षी पाच टक्के शुल्कवाढ करण्याचा या आधीचा प्रस्ताव होता. विद्या परिषदेच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, ""२००४ मध्ये [illegible]ा निर्णयानुसार दर दोन वर्षांनी [illegible]क्के शुल्कवाढीचा निर्णय घेण्यात आला होता. त्यात बदल करून दर वर्षी पाच टक्के वाढीचा निर्णय परीक्षा मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मात्र, ही वाढदेखील आता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नवे विषय, तुकडीवाढ असे संलग्नीकरणाचे १४६ प्रस्ताव होते. या शिवाय कायमस्वरूपी संलग्नीकरणाचे २३ प्रस्ताव होते."

**अभ्यासक्रमात बदल**

येत्या शैक्षणिक वर्षापासून सर्व शाखांचा प्रथम वर्षाचा; तसेच पदव्युत्तरच्या पहिल्या वर्षाचा अभ्यासक्रम बदलण्यात येणार आहे, असे डॉ. जाधव यांनी सांगितले. ते म्हणाले, "नव्याने रचना केलेल्या अभ्यासक्रमांना बैठकीत मान्यता देण्यात आली. पदवी अभ्यासक्रमासाठी तज्ज्ञांमार्फत पुस्तके लिहून घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. विद्यापीठात चालविल्या जाणाऱ्या ४८४ अभ्यासक्रमांपैकी १२२ अभ्यासक्रम या वर्षी बदलण्यात येत आहेत. पीएच.डी. व पीएच.डी.च्या मार्गदर्शकांबाबत नियमांत बदल करण्यात येणार आहेत. यावर बैठकीत चर्चा झाली. निर्णय घेण्याचे अधिकार कुलगुरूंना देण्यात आले."

**दूरशिक्षण अभ्यासक्रम**

**विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणाऱ्या बहिःस्थ अभ्यासक्रमाला दूरशिक्षण अभ्यासक्रम म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव आहे. या अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याबरोबरच योग्य त्या सूचना करण्यासाठी प्राचार्य नंदकुमार निकम यांची समिती नेमण्यात आली आहे. विद्यापीठाच्या दूरशिक्षण अभ्यासक्रमला अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील.**

'एमपीएम'सारख्या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांना विद्यापीठ अनुदान मंडळ किंवा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची (एआयसीटीई) मान्यता नाही. मात्र, विविध विद्यापीठांची या अभ्यासक्रमाला मान्यता आहे. यातून मार्ग काढण्यासाठी डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीचा अहवाल बैठकीत सादर करण्यात आला. त्यावर चर्चा झाली असून बैठकीतील सूचनांचा विचार करून सुधारित अहवाल मांडण्यात येणार आहे. या प्रश्नवार चर्चा करण्यासाठी संबंधितांची विशेष बैठक घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सकाळ 10/5/08

# विद्यापीठाच्या परीक्षा फीमध्ये आणखी दोन वर्षे वाढ नाही

**म. टा. प्रतिनिधी**

पुणे विद्यापीठाच्या परीक्षा फीमध्ये पुढील दोन वर्षात कोणतीही वाढ करण्यात येणार नाही. नुकत्याच झालेल्या ॲकॅडमिक कौन्सिलच्या बैठकीमध्ये यासंदर्भात निर्णय घेण्यात आला असल्याचे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

विद्यापीठाने २००४ पासून दर दोन वर्षांनी परीक्षा फीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार २००६ मध्ये परीक्षा फी मध्ये १० टक्के वाढ करण्यात आली होती. यंदाच्या वर्षी परीक्षा मंडळाने फीमध्ये पाच टक्के वाढ करण्यास सुचवले होते. मात्र, विद्यापीठाच्या परीक्षा विभागाची आर्थिक स्थिती चांगली असल्याने पुढील दोन वर्ष परीक्षा फीमध्ये कोणतीही वाढ करण्यात येणार नसल्याचे जाधव यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठातील १३ विद्याशाखांच्या पदवीच्या प्रथम वर्षाच्या आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमांची येत्या शैक्षणिक वर्षापासून पुनर्रचना करण्यात येणार असून त्याला ॲकॅडमिक कौन्सिलने मान्यता दिली आहे. अभ्यासक्रमाच्या पुनर्रचनेची प्रक्रिया एक ऑगस्ट २००६ पासून सुरू झाली. त्यामध्ये २२२ अभ्यासक्रमांची पुनर्रचना करण्यात आली आहे. नवा अभ्यासक्रम लवकरच वेबसाइटवर टाकण्यात येणार आहे.

कॉलेजमध्ये घेण्यात येणाऱ्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून सेमिस्टर पद्धत लागू करण्यात येणार असून २००९-१० या वर्षापासून क्रेडिट सिस्टीम सुरू करण्यात येणार आहे. पीएच.डी, एम. फिल आणि पीएच.डी मार्गदर्शक नेमण्याच्या नियमांमध्ये बदल करण्यात येणार असून त्यासंदर्भातील अंतिम मसुदा लवकरच तयार करण्यात येणार आहे.

विद्यापीठाकडे आलेल्या २३ कॉलेजेस्च्या कायम संलग्नीकरणाच्या प्रस्तावांना ॲकॅडमिक कौन्सिलच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली असल्याचे जाधव यांनी नमूद केले.

महाराष्ट्र टाईम्स 10/5/08

# पुणे विद्यापीठाला लघुपट महोत्सवात अकरा पुरस्कार

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय पातळीवर झालेल्या विविध लघुपट महोत्सवात पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन अभ्यास विभागाने तब्बल ११ पुरस्कार पटकाविले आहेत. त्यात चेन्नई येथील गेटवे आंतरराष्ट्रीय महोत्सवातील प्रथम तीन पुरस्कारांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांनी दिग्दर्शन, छायाचित्रण, संपादन आदी प्रकारांमध्ये हे पुरस्कार पटकाविले आहेत. गेटवे लघुपट महोत्सवात अभिव्यक्ती पाटील या विद्यार्थिनीने दिग्दर्शित केलेल्या 'पंख' लघुपटाला प्रथम पुरस्कार प्राप्त झाला असून, अनिल माने दिग्दर्शित 'ओढ'ला दुसरा, तर किम जो यंग हे या विद्यार्थिनीच्या 'मी रिटा आहे' लघुपटाला तिसरा पुरस्कार मिळाला. राहुल मालपेने सर्वोत्कृष्ट संकलनाचा पुरस्कार पटकाविला. अलीगड येथील फिल्मसाझ लघुपट महोत्सवात ऋत्विक सावंत दिग्दर्शित 'निष्कासित'ला प्रथम पुरस्कार, तर समीर कांबळेला 'कुल्फी' लघुपटासाठी सर्वोत्कृष्ट छायाचित्रणाचा पुरस्कार मिळाला. सिंहगड इन्स्टिट्यूटच्या महोत्सवात स्वप्नील कापुरे दिग्दर्शित 'मारत्या'ला लघुपटाने पहिला पुरस्कार पटकाविला. पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन अभ्यास विभागाचे प्रमुख डॉ. के. आर. सानप यांनी ही माहिती दिली. कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# Varsity will absorb rising costs: Jadhav

**Pune:** The University of Pune's academic council on Friday formally announced the varsity's decision not to effect a hike in the exam fees for the next two years.

UoP vice-chancellor (V-C) Narendra Jadhav explained that the university had decided in 2004 that exam fees would be increased at the rate of 10 per cent after every two years, to match the rising costs and inflation.

"The fee was hiked in 2004 and again in 2006 and with the fresh revision due, the university's board of exam had recommended a five per cent increase in the exam fee," the V-C said.

Jadhav said the recommendation was turned down as the university did not want to put an extra burden on the students. "Our (UoP's) exam department is in a comfortably surplus position so as to absorb the existing rise in the costs without increasing the fees," he said.

According to the university's revised budget for 2007-08, the exam department's annual earning is Rs 46.17 crore and is expected to increase by Rs 2.73 crore, to touch Rs 48.90 crore in 2008-09. Against this, the annual spend is Rs 25.48 crore for 2007-08, estimated to go up to Rs 29.46 crore in 2008-09.

Times of India